जा.क्र.का.15/हायवे सन्मुख जमिनी/मूल्यांकन/
परिपत्रक/ 348
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 05/04/2016.

**परिपत्रक :-**

विषय :- ग्रामीण क्षेत्रातील हायवे (राष्ट्रीय व राज्य महामार्ग) सन्मुख जमिनींचे मूल्यांकनाबाबत.

मुंबई मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निर्धारीत करणे) नियम 1995 अन्वये प्रतिवर्षी वार्षिक मूल्य दर तक्ते तयार केले जातात. वार्षिक मूल्य दर तक्त्याची नागरी, प्रभाव व ग्रामीण अशा 3 क्षेत्रात विभागणी केली जाते. नागरी व प्रभाव क्षेत्रातील वार्षिक मूल्य दर तक्ते, सविस्तर केले जात असून त्यामध्ये जागेचे स्थान, अनुज्ञेय भूवापर इ.बाबी विचारात घेऊन स.नं./ ग.नं. निहाय मूल्य दर दिलेले असतात. ग्रामीण क्षेत्रामध्ये जमिनीच्या प्रत्येक स.नं./ ग.नं. निहाय सविस्तर वार्षिक मूल्य दर तक्ते केले जात नसून, गावासाठी 1 ते 7 गटात विभागणी केली जाते व प्रत्येक गटातील गावासाठी जमिनीच्या महसूल आकाराप्रमाणे जिरायत जमिनीचे दर, बिनशेती दर, हायवेवरील जमिनीचे दर इ.तपशील नुसार मूल्य दर दिले जातात.

ग्रामीण क्षेत्रात हायवेवरील जमिनीचे दर दिलेले असतात, मात्र नोंदणी अधिका-यांना दस्तात नमूद स.नं./ ग.नं. हा हायवेवरील की इतरत्र आहे यांची पडताळणी करता येत नाही. पक्षकाराकडून मुद्रांक चुकविण्यासाठी जागेच्या वर्णनामध्ये हायवेसन्मुख नमूद न केल्यास हायवेवरील जमिनीचे व्यवहारही जिरायत शेत जमिनीप्रमाणे नोंदविले जाऊन शासनाचे महसूली नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव, महाराष्ट्रातील सर्व राष्ट्रीय महामार्ग (NH) राज्य महामार्ग (SH) सन्मुख जमिनीच्या स.नं./ ग.नं. ची माहिती MRSAC कडून प्राप्त करुन घेतली असून, हायवेसन्मुख स.नं./ ग.नं.ची गावनिहाय यादी (Excel pdf format) मध्ये संबंधित जिल्हयाच्या सह जिल्हा निबंधकामार्फत, सर्व नोंदणी अधिका-यांना उपलब्ध करुन दिली आहे.

सर्व नोंदणी अधिका-यांनी ग्रामीण क्षेत्रातील व्यवहाराची दस्त नोंदणी करताना त्यामधील स.नं./ ग.नं. हा हायवेसन्मुख आहे किंवा कसे याची, सदर यादीतील तपशीलानुसार पडताळणी करुन, अशा जमिनीचे मूल्यांकन उर्वरीत महाराष्ट्रासाठी लागू असलेल्या मार्गदर्शक सूचना क्र.29 (ब) नुसार करण्यात यावे

सदर सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अन्यथा गंभीर दखल घेतली जाईल.

उक्त परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
5) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/ नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
   -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.
8) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
9) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता